# जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड

स्टेशन रोड, नांदेड – ४३१६०१

E-mail : mahnandc@mhstate.nic.in

Telephone No. : 02462 - **241488** Fax No. : 02462-244682

## निविदा सूचना

याद्वारे कळविण्यात येते की, नांदेड जिल्हा न्यायालयातील विविध प्रकारच्या प्रिंटरला लागणा—या टोनरचा पुरवठा (यासोबतच्या परिशीष्ट "अ" नूसार) एक वर्षाच्या कालावधीसाठी आवश्यकतेनूसार खरेदी करावयाची आहे.

करिता याद्वारे विविध प्रकारच्या प्रिंटरसाठी लागणा—या टोनर च्या खरेदीस्तव स्थानिक बाजारातील इच्छूक पुरवठादारांकडून दिनांक १० सप्टेंबर, २०२५ टोनर खरेदी कराराकरिता जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर निवीदा प्रकाशित करण्यात आली होती. परंतु विहीत मुदतीत पुरेशा निवीदा प्राप्त न झाल्यामुळे उपरोक्त निवीदेस दिनांक १३ नोव्हेंबर, २०२५ च्या कार्यालयीन वेळेपर्यंत खालील अटी व शर्तीनुसार मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यानंतर आलेल्या निवीदांचा विचार केला जाणार नाही.

तरी, इच्छूक पुरवठादारांनी मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड यांचे नांवे सीलबंद निविदा या कार्यालयास सादर कराव्यात. तसेच सीलबंद निविदा लिफाफ्यावर **"विविध प्रकारच्या प्रिंटरसाठी लागणा—या टोनरचा पुरवठा करण्यासाठीची निविदा"** असा उल्लेख करावा.

### विविध प्रकारच्या प्रिंटरसाठी लागणा—या टोनरचा पुरवठा करण्यासाठीची निवीदा खालील निकष व अटींनुसार मंजूर करण्यात येतील.

- **खालील प्रकारच्या प्रिंटरसाठी (Kyocera M-240 DN Printer, HP 1606 Laser Printer Cartriage 78A, HP 202 Laser Printer Cartriage 88A, Canon 6200 D & MF 4750 Printer Cartriage 326A 328, Canon 151 DW Printer Cartriage 337, HP M-203 DN Printer Cartriage 30A with Chip, HP M-203 DN Printer Cartriage 32A with Chip, Canon LBP 246dw) या सर्व प्रिंटरसाठी लागणा—या सुसंगत** (Compatible) **टोनरचा पुरवठा एक वर्षाच्या कालावधीकरीता आवश्यकतेनूसार करणेसाठी विविध प्रकारच्या टोनर ची खरेदी करावयाची असल्यामुळे कोणत्या कंपनीचे टोनर पुरवठा करणार आहात त्या कंपनीचे नाव व वारंटी कालावधी याचा स्पष्ट उल्लेख निविदेसोबत जोडण्यात यावा.**
- निवीदा दाखल करणाऱ्या इच्छूक पुरवठादाराकडे PAN / GST / सेल्स टॅक्स नंबर असणे आवश्यक असून त्याची स्वसाक्षांकित प्रत निविदेसोबत जोडण्यात यावी.
- निवीदा दाखल करणाऱ्या इच्छूक पुरवठादाराने निविदेसोबत सदरहू **टोनर** पुरविण्याबाबत शासनाकडून दुकाने व आस्थापनांची नोंदणी अधिनियमांतर्गत प्राप्त दुकानाची/आस्थापनेची नोंदणी असणारे व मुदत दर्शविणारे दस्त सोबत जोडणे आवश्यक आहे.
- **टोनर च्या** दर्जानुसार मंजूरी देण्यात येईल. तसेच, किंमत व दर देखील विचारात घेतले जातील. निविदे मधील नमूद टोनर उत्तम दर्जाचे असावेत.

- पुरवठा करण्यात आलेले विविध प्रकारचे **टोनर** समाधानकारक असल्याची खातरजमा झाल्यानंतरच आपले देयक अदा केले जाईल. तसेच एखादे टोनर डॅमेज निघाल्यास त्वरीत नवीन दुसरे टोनर विनामोबदला बदलून दयावे लागेल.
- मंजूर निवीदेतील विविध प्रकारच्या प्रिंटरचे टोनर हे आवश्यक मागणीनूसार जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड येथे पुरवठा करावे लागतील, तसेच यासाठी कोणताही वाहतुक व प्रवास खर्च आणि त्याअनुषंगीक कोणतेही भत्ते पुरवठादारास अनुज्ञेय असणार नाहीत. तसेच दरपत्रक हे सर्व करांसहीत असावेत.
- मंजूर निवीदेतील विविध प्रकारच्या प्रिंटर साठी लागणा—या आवश्यक टोनरच्या मागणीनूसार टोनरच्या पुरवठयाचा खरेदी आदेश मंजूर पुरवठादारास ई—मेलद्ववारे/ दूरध्वनीद्वारे कळविण्यात येईल व त्यानुसार तात्काळ टोनरचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.
- निवीदाधारक/पुरवठादाराकडून टोनर पुरवठयानंतर सदरचे उधार मागणी बील प्राप्त झाल्यानंतर खरेदी खर्चाचे देयक उपलब्ध अनुदानानुसार तसेच, कोषागारातुन देयक पारित झाल्यानंतर पुरवठादारास त्याच्या नमुद बॅक खात्यात ऑनलाइन जमा करण्यात येईल.
- देयक अदा केल्यानंतर आपणास देयक रक्कम मिळाल्याची पावती जिल्हा न्यायालयास सादर करावी लागेल.
- **निविदा मंजूर करतेवेळेस प्रिंटरच्या टोनरची** किंमत व दर्जानुसार पुरवठादारांची निविदा मंजूर केली जावू शकते.
- सदरहू निवीदेमध्ये कोणत्याही क्षणी कोणत्याही कारणाशिवाय बदल, दुरूस्ती किंवा सुधारणा करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे.
- सदरहू करण्यात आलेला दरकरार / निवीदा कोणत्याही क्षणी कोणत्याही कारणाशिवाय मंजूर अथवा रद्द करण्याचा संपूर्णतः अधिकार हा या कार्यालयाचा राहील.
- निविदेबाबतच्या विवादासाठी न्यायिक क्षेत्र नांदेड असेल.
- तसेच निविदाधारकाची निविदा मंजूरीनंतरही प्रत्यक्ष खरेदी करतेवेळी शासनाच्या GeM Portal वरील दर पाहून जर GeM Protal वरील दर कमी असल्यास त्यावरुन टोनर खरेदी करण्याचे स्वातंत्र्य या कार्यालयास राहिल.

''आदेशावरून''

जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड }

दिनांक : ०४ नोव्हेंबर, २०२५ }

प्रबंधक, 04.11.2025
जिल्हा न्यायालय, नांदेड

जा.क्र./संगणक विभाग/ 8971 /२०२५

प्रती,

- अधिक्षक, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, नांदेड यांना सदरहू निवीदा सूचना अग्रेषीत करण्यात येवून कळविण्यात येते की, त्याची एक प्रत बेलीफामार्फत तात्काळ खालील ठिकाणी डकविण्यात यावी व मुळ गोषवारा संगणक विभागास परत करण्यात यावा.

१) जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
२) दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
३) मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
४) जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड

प्रबंधक, 04.11.2025
जिल्हा न्यायालय, नांदेड

## परिशिष्ट "अ"

| अ.क्र. | प्रिंटरच्या कार्टरिजचे विवरण | कालावधी |
|---|---|---|
| १ | कायोसरा एम—२०४० डीएन प्रिंटर (Kyocera M-240 Printer) कार्टरिज ७८ ए नविन (Original/Compatible Cartridge) | आवश्यक मागणीनूसार एक वर्षाच्या कालावधीसाठी |
| २ | एच.पी. १६०६ प्रिंटर कार्टरिज ७८ ए नविन (Original/Compatible Cartridge) | आवश्यक मागणीनूसार एक वर्षाच्या कालावधीसाठी |
| 3 | एच.पी. २०२ प्रिंटर कार्टरिज ८८ ए नविन (Original/Compatible Cartridge) | आवश्यक मागणीनूसार एक वर्षाच्या कालावधीसाठी |
| 4 | कॅनॉन ६२०० डी व एमएफ ४७५० प्रिंटर कार्टरिज ३२६ ए ३२८ नविन (Original/Compatible Cartridge) | आवश्यक मागणीनूसार एक वर्षाच्या कालावधीसाठी |
| 5 | कॅनॉन १५१ डीडब्ल्यू प्रिंटर कार्टरिज ३३७ नविन (Original/Compatible Cartridge) | आवश्यक मागणीनूसार एक वर्षाच्या कालावधीसाठी |
| 6 | एच.पी. एम—२०३ डिएन प्रिंटर कार्टरिज ३० ए चिप सोबत नविन (Original/Compatible Cartridge) | आवश्यक मागणीनूसार एक वर्षाच्या कालावधीसाठी |
| 7 | एच.पी. एम—२०३ डिएन प्रिंटर कार्टरिज ३२ ए चिप सोबत नविन (Original/Compatible Cartridge) | आवश्यक मागणीनूसार एक वर्षाच्या कालावधीसाठी |
| 8 | कॅनान एलबीपी २४६ डिब्लु प्रिंटर कार्टरिज चिप सोबत नविन (Original/Compatible Cartridge) | आवश्यक मागणीनूसार एक वर्षाच्या कालावधीसाठी |